दि. 28/02/2023

1) लोकसत्ता पान क्र. 3

# मुंबईवर पुन्हा दहशतवादाचे सावट?

## परदेशातून प्रशिक्षण घेऊन आलेला हस्तक शहरात; राष्ट्रीय तपास संस्थेकडून माहिती

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** चीन, हाँगकाँग, पाकिस्तान येथे प्रशिक्षण घेऊन आलेला हस्तक मुंबईत आल्याचे राष्ट्रीय तपास संस्थेकडून (एनआयए) मुंबई पोलिसांना कळवण्यात आले आहे. एनआयएकडून रविवारी याबाबत ईमेल आला असल्याची माहिती वरिष्ठ सूत्रांनी दिली.



सरफराज मेमन हा संशयित मुंबईत पोहोचल्याची माहिती देण्यात आली आहे. एनआयए या राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणेकडून मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला सावध राहण्याबाबतचा मेल आला असल्याची सूत्रांनी माहिती दिली. सरफराज हा मध्य प्रदेशच्या इंदूरचा असल्याचे त्यात म्हटले आहे. त्यामुळे मध्य प्रदेश पोलिसांनाही याबाबत कळवण्यात आले आहे. ही व्यक्ती भारतासाठी धोकादायक असून त्याची ओळख पटावी यासाठी त्याचा चालक परवाना, पारपत्र आधारकार्डची प्रत एनआयएकडून पोलिसांना ईमेलद्वारे पाठवलेली आहे. या संशयित व्यक्तीचा शोध सध्या सर्वत्र सुरू असून सुरक्षा यंत्रणांना सतर्क करण्यात आले आहे.

यापूर्वी फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात एनआयएला मुंबईवर हल्ला करण्याच्या नियोजनाबाबत ईमेल मिळाला होता. तपासणीत तो पाकिस्तानातील असल्याचे निष्पन्न झाले. ई-मेलमध्ये सीआयएचा अधिकारी असल्याचे भासवण्यात आले आहे. तसेच मुंबई पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाला पाकिस्तानातील एका क्रमांकावरुन २६/११ सारखा भीषण दहशतवादी हल्ला होणार असल्याचा संदेश आला होता. मुंबई वाहतूक पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला एका अनोळखी क्रमांकावरून संदेश मिळाला होता. सोमालिया देशातील मोबाइल क्रमांकावरून हा संदेश पाठवण्यात आला होता. त्यात त्यांच्या देशात घडलेल्या दहशतवादी घटनांच्या अनुषंगाने खबरदारी बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. सांताक्रुझ येथील एका व्यक्तीला घातपाताच्या धमकीचा व्हिडिओ कॉल आला होता. अशा घटनांमुळे सुरक्षा यंत्रणांवर ताण येत आहे.

2) लोकसत्ता पू. पान क्र. 3

# भाजपच्या माजी नगरसेविकेचा छळ

## पतीविरोधात नवघर पोलिसांत गुन्हा

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या भाजपच्या माजी नगरसेविका मेघना रावल यांचा पतीकडून छळ केला जात असल्याची बाब समोर आली आहे. या संदर्भात मेघना यांच्या तक्रारीवरून नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मेघना या नगरसेविका असताना त्यांना २०२० मध्ये पती दीपक रावल यांचे एका तरुणीशी संबंध असल्याचे समजले होते. त्याबाबत त्यांनी जाब विचारताच दीपक यांनी त्यांना शिवीगाळ व मारहाण केली. हा प्रकार सतत सुरू होता. २३ फेब्रुवारी रोजीही जेवण बनवण्यावरून दोघांमध्ये भांडण झाले होते. याचा राग मनात धरून दीपक यांनी मेघना यांना मारहाण करून स्वयंपाकघरात कोंडून ठेवले होते.

त्यामुळे मेघना यांनी २४ फेब्रुवारीला पतीविरोधात शिवीगाळ, मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास देत असल्याची तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तर, दीपक यांना नोटीस पाठवून पुढील तपास सुरू केल्याची माहिती नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद देसाई यांनी दिली.

3) लोकमत पान क्र. 3

# मद्यपी महिलेची पती, मुलांना बेदम मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** दारू पिऊन स्वतःच्या अल्पवयीन मुलींना नेहमी मारहाण करणाऱ्या आईविरुद्ध भाईंदरच्या नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत २५ फेब्रुवारीला दाखल गुन्ह्यातील फिर्यादीनुसार, निमई बाऊर (३९) हे भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक फेज ८ मधील सिद्धिविनायक टॉवरमध्ये पत्नी सुदेसना (३३), मुली निराली (१२) आणि नायेरा (६) यांच्यासह राहतात. निमई हे मुंबईच्या झवेरी बाजार भागात दागिने डिझाईन करायचे काम करतात. निराली ही सहावीत, तर नायेरा सीनियर केजीमध्ये शिकते. गेल्या ८ वर्षांपासून सुदेसना हिला दारूचे व्यसन जडले असून ती दारू पिऊन नेहमी पती निमई यांच्यासह मुलींना मारझोड, शिवीगाळ करते. निमईला त्याचा मित्र अमोल माहेती याने कॉल करून तुझ्या दोन्ही मुलींच्या हातापायाला लागल्याचे सांगितले. त्यानंतर निमई हे कामावरून लगेच निघून मित्राकडे पोहोचले. दोन्ही मुलींना त्यांच्या आई सुदेसना हिने स्टीलच्या लाटणे आणि झाऱ्याने जबर मारहाण केल्याचा मोबाइलमधील व्हिडीओ छोट्या नायेराने वडिलांना दाखवला. दोन्ही मुलींवर औषधोपचार करून निमई हे घरी पोहोचले. त्यांनी सुदेसना हिला जाब विचारला असता तिने पतीला शिवीगाळ केली.

निमई यांच्या फिर्यादीवरून सुदेसनावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

CamScanner
Scanned with CamScanner

4) लोकसत्ता पृ. पान क्र. 1

दि. 28/02/2023

# वसई सनसिटीची दफनभूमी कायदेशीर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या सनसिटी येथील सर्वधर्मीय दफनभूमीच्या विरोधात हिंदुत्ववादी संघटनांनी मोर्चा काढून विरोध केला असला, तरी या दफनभूमीचे काम नियमानुसार असल्याने निर्णय रद्द करणार नसल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. या दफनभूमीसाठी सर्व प्रकारच्या परवानग्या घेतल्या असून ती कायदेशीर असल्याचे पालिकेने सांगितले.

वसई पश्चिमेच्या सनसिटी येथे पालिकेतर्फे सर्वधर्मीय दफनभूमी तयार करण्यात येत आहे. या ठिकाणी मुस्लीम, प्रोटेस्टंट ख्रिस्ती आणि हिंदू लिंगायत समाजासाठी दफनभूमी तयार केली जात आहे. रविवारी या दफनभूमीच्या विरोधात हिंदुत्ववादी संघटनांनी मोर्चा काढला होता. 'हिंदू वसाहतीत मुस्लिमांची दफनभूमी नको', 'हा जमीन जिहाद आहे', 'हिंदूंच्या जागा बळकावण्याचे षड्यंत्र आहे' असे आरोप करण्यात आले. यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी दगडफेक करून भिंत पाडण्याचा प्रयत्न केला होता. मात्र पोलिसांनी तो प्रयत्न हाणून पाडला. या मोर्चानंतर या दफनभूमीच्या कामावर प्रश्न निर्माण झाला होता. मात्र ही दफनभूमी केवळ मुस्लीम धर्मीयांची नसून ती सर्वधर्मीय आहे. त्याला सर्व परवानग्या असून **(पान ४ वर)**

## सर्वधर्मीय दफनभूमी आणि वाद

शहरातील मुस्लीम धर्मीयांसह इतर धर्मीयांसाठी दफनभूमी नव्हती. त्यामुळे मुस्लीम समाजाची मोठी गैरसोय होत होती. त्यासाठी वसई विरार महापालिकेने सर्वधर्मीयांसाठी दफनभूमी बनविण्याची योजना तयार केली होती. त्यासाठी वसईच्या सनसिटी येथे ११ एकर जागा आरक्षित केली होती. राज्य शासनाकडून २०११ मध्ये ही जागा पालिकेच्या ताब्यात आली होती. पालिकेने २०१३ मध्ये या जागेवर माती भराव करून भिंत बांधली होती. मात्र या दफनभूमीला स्थानिक नागरिकांनी जोरदार विरोध केला होता. दरम्यान, पालिकेने केलेले दफनभूमीचे बांधकाम सागरी किनारा नियंत्रण क्षेत्राचे उल्लंघन करणारे असल्याचा आरोप करत हरित लवादाकडे तक्रार करण्यात आली होती. त्यामुळे हरित लवादाने बांधकाम थांबवून भिंत पाडण्याचे आदेश दिले होते. तेव्हापासून या दफनभूमीचे काम रखडले होते. त्यानंतर पुन्हा पालिकेने या कामासाठी परवानगी मिळवण्याचे काम सुरू केले होते. यात पालिकेला महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण आणि पाणथळ विभागाच्या परवानग्या मिळाल्या आहेत. एकूण साडेसहा एकर जागेत असलेल्या या दफनभूमीत मुस्लीम धर्मीयांसाठी अडीच एकर, ख्रिस्ती धर्मीयांसाठी ३ एकर, हिंदूंसाठी १५ गुंठे तर आणि बेवारस मृतदेह पुरण्यासाठी जागा ठेवण्यात आली आहे.

5) पुढारी पृ. पान क्र. 2

# भाईंदरमध्ये बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई

## वाहतूककोंडी करणाऱ्यांना ठोठावला दंड

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाण पुलाच्या बाजूला रिक्षा उभ्या करणाऱ्या रिक्षावर काशिमिरा वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे.

भाईंदर पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाण पुलाच्या बाजूलाच गेल्या काही दिवसांपासून रिक्षाचालकांनी रिक्षा स्टँड बनवले होते. या रिक्षामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे उड्डाणपुलाच्या सुरुवातीला रिक्षा उभ्या करून प्रवाशांची प्रतीक्षा करत प्रवासी वाहतूक केली जात होती. वाहतूक विभागाने या समस्येकडे कानाडोळा केला जात होता. यामुळे शहरातील रिक्षाचालकांची हिंमत वाढत गेली व उड्डाण पुलाला रिक्षा स्टँडचे स्वरूप निर्माण झाले होते. काशिमीरा वाहतूक पोलिसांनी उड्डाणपुलावर रिक्षा उभ्या करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

गोल्डन नेस्ट परिसरात उड्डाणपुलावर रिक्षा उभ्या करत वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या २० ते २५ रिक्षाचालकांवर वाहतूक पोलिसांनी कलम १२२, १७७ प्रमाणे नो-पार्किंगच्या कारवाई करत प्रत्येकी ५०० रुपये दंड आकारला असल्याची माहिती वाहतूक विभागा मार्फत देण्यात आली आहे. उड्डाणपुलावर अवैधरित्या रिक्षा पार्किंग करून वाहतुकीचा अडथळा निर्माण करणाऱ्या रिक्षा चालकांवर यापुढेही सतत कारवाई केली जाणार असल्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक नरळे, वाहतूक विभाग यांनी सांगितले आहे.

# वसई सनसिटीची दफनभूमी कायदेशीर

(पान १ वरून) नियमानुसार काम होत आहे. त्यामुळे या दफनभूमी हटविण्याचा प्रश्नच येत नाही असे पालिकेने स्पष्ट केले. या दफनभूमीसाठी ३० वर्षांपासून पाठपुरावा करणाऱ्या वसई तालुका मुस्लीम कब्रस्तान समितीने हा मोर्चा म्हणजे राजकीय स्टंट असल्याचे म्हटले आहे. निवडणुका आल्याने नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण करून जातीय द्वेष पसरविण्याचे हे षड्यंत्र असल्याचा आरोप समितीचे अध्यक्ष ॲड. खलील शेख यांनी केला आहे. दफनभूमी, कचराभूमी या शहराच्या गरजा आहेत. त्या कुठेना कुठे तरी बनवाव्या लागतात. इथून हटविल्या तर दुसरीकडे जागा दिली जाणार आहे का? असा सवालही त्यांनी केला. या मोर्चात स्थानिकांऐवजी विविध ठिकाणाहून आणलेल्या नागरिकांचा सहभाग मोठा होता. त्यात विश्वहिंदू परिषद, बजरंग दल, भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने होते.

> “विकास आराखड्यात सर्वधर्मीय दफनभूमीसाठी ही जागा आरक्षित होती. त्याला सर्व प्रकारच्या शासनाच्या परवानग्या मिळालेल्या आहेत. कुठल्याही नियमांचे किंवा न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झालेले नाही.
>
> **-अनिलकुमार पवार,**
> आयुक्त, वसई विरार महापालिका

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 28/02/2023

6) सकाळ पान क्र. ३

# काँग्रेस सदस्याविरोधातील फौजदारी फिर्याद रद्द

## पाटील यांच्यावरील पोस्ट प्रकरण

मुंबई, ता. २७ : उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याविरोधात समाज माध्यमावर संदेश टाकणाऱ्या काँग्रेसच्या कार्यकर्त्याविरोधातील फौजदारी फिर्यादी मुंबई उच्च न्यायालयाने रद्दबातल केल्या आहेत. तसेच या प्रकरणात गुन्हा दाखल करणाऱ्या पोलिसांकडूनही २५ हजार रुपये दंड वसूल करण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले.

दोन महिन्यांपूर्वी भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त विधानांमुळे गदारोळ निर्माण झाला होता. त्या वेळी पुण्यातील काँग्रेसचे कार्यकर्ते संदीप कुदळे यांनी काही व्हिडिओ समाज माध्यमावर टाकले होते. यामधील एक व्हिडिओ पाटील यांच्या घराबाहेर तयार केला होता. या पोस्टमुळे वातावरण विघळले, असा आरोप पोलिसांनी करून मागील वर्षी डिसेंबरमध्ये (ता. ११) त्यांना अटक केली. याविरोधात कुदळे यांनी न्यायालयात याचिका केली. न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने दोन्ही तक्रारी रद्दबातल केल्या. कुदळे यांनी मंत्री पाटील यांच्या विधानावर टीका केली होती; मात्र त्यातून कोणताही गुन्हा होत नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार प्रत्येकाला आहे आणि तो दडपण्यासाठी कायद्याचा वापर होता कामा नये, असे न्यायालयाने सुनावले.

### 'पोलिसांनी नाही म्हणायला शिकावे'

गुन्हा दाखल करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याला दंड सुनावण्याला महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी विरोध केला; मात्र खंडपीठाने हा विरोध अमान्य केला. पोलिसांना त्यांच्या कारवाईचे काय परिणाम होऊ शकतात हे समजायला हवे. कोणताही गुन्हा होत नसताना अशी कारवाई करणे बरोबर नाही. जरी ते दबावाखाली असले तरी पोलिसांनी नाही म्हणायला शिकले पाहिजे, असे खडे बोल न्यायालयाने सुनावले.

### पोलिसांवर प्रश्नांची सरबत्ती

कोथरूड पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला होता. कुदळे यांच्या व्हिडिओमुळे दोन धर्मांत तेढ निर्माण झाली असा आरोप पोलिसांनी केला होता; मात्र खंडपीठाने याबाबत असहमती व्यक्त केली. पोलिसांनी यामध्ये नियमानुसार नोटीस बजावली होती का, तसेच ज्यामुळे हे प्रकरण निर्माण झाले त्याची चौकशी केली होती का, असे प्रश्न खंडपीठाने उपस्थित केले.

7) लोकमत पू. पान क्र. १

# केवायसी अपडेट करताच डॉक्टरचे बँक खाते साफ

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : केवायसी अपडेट करण्यासाठी म्हणून अनोळखी व्यक्तीने पाठविलेली लिंक क्लिक केल्याने भाईंदरच्या डॉक्टरची ९९ हजारांची सायबर लुटारूंनी ऑनलाइन फसवणूक केली.

भाईंदर पूर्वेतील जानकी अव्हेन्यूमध्ये राहणारे डॉ. संतोष पांडे यांचे मीरा रोडमध्ये रुग्णालय आहे. त्यांच्या मोटारकारवरील फास्ट टॅगमध्ये पैसे कमी असल्याने ते रिचार्ज करण्यासाठी त्यांनी बँकेच्या ग्राहक सहायता क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा आमचे प्रतिनिधी तुमच्याशी संपर्क करतील असे त्यांना सांगण्यात आले. काही वेळाने अनोळखी क्रमांकावरून त्यांना कॉल आला. त्याने मोटारीचा क्रमांक मागितला तो पांडे यांनी दिला. त्याने पांडे यांना बँक खात्याचे केवायसी अपडेट करण्यास सांगितले. त्यासाठी एक लिंक पाठवून ती लिंक दुसऱ्या क्रमांकावर पाठविण्यास सांगितले. त्यानुसार पांडे यांनी करताच सायंकाळी त्यांच्या मुख्य बँक खात्यातून ९९ हजार काढल्याचे त्यांच्या लक्षात आले. डॉ. पांडे यांनी नवघर पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यावर गुन्हा दाखल झाला.

8) लोकमत पू. पान क्र. १

# देवपूजा करताना साडी पेटल्याने महिलेचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : घरात देवाची पूजा करताना दिव्यामुळे साडीचा पदर पेटून गंभीर भाजलेल्या २६ वर्षीय महिलेचा रविवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला.

भाईंदर पूर्वेच्या आर.एन.पी. पार्क येथील डायमंड कुशल इमारतीत प्रियंका दास (वय २६) राहतात. नेहमीप्रमाणे त्या दुपारी घरात देवाची पूजा करीत होत्या. त्यावेळी साडीचा पदर दिव्याला लागून पेटला. साडीने पेट घेतल्याने प्रियांका ह्या गंभीर भाजल्या. त्यांना मुंबईच्या कस्तुरबा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, रविवारी दुपारी २ वाजता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी आग्रीपाडा पोलिसांनी घटनेची नोंद केली आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु.पान क्र.3 दि. 28/02/2023

(9)

# वीज दरवाढीविरोधात ग्राहक आक्रमक

## महावितरणची दरवाढीची याचिका फेटाळण्याची मागणी

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** महावितरणकडून तूट भरून काढण्यासाठी वीज दरवाढीची याचिका दाखल करण्यात आल्याने वीजग्राहक आक्रमक झाले आहेत. वीज दरवाढीसंदर्भात दाखल करण्यात आलेली याचिका फेटाळून लावावी, अशी मागणी ग्राहकांनी केली आहे.

वसई-विरार शहरात महावितरणकडून वीजपुरवठा केला जातो. महावितरणने तूट भरून काढण्यासाठी दरवाढीची मागणी करणारी याचिका नुकतीच दाखल केली आहे. त्यात आगामी दोन वर्षांमध्ये ६७ हजार ६४४ कोटी रुपयांची भरपाई देण्याची मागणी केली आहे. ही दरवाढ सरासरी २.५५ रु. प्रति युनिट इतकी म्हणजे सरासरी ३७ टक्के दरवाढीची आहे. त्यामुळे महावितरणने केलेली मागणी वीज ग्राहकांना धक्का देणारी असल्याचे ग्राहकांनी सांगितले आहे.

आधीच वीज महाग असल्याने घरगुती ग्राहक, शेती पंप, उद्योजक, शैक्षणिक, सहकारी संस्था, व्यावसायिक आस्थापने व उद्योग व्यवसायांना वीज परवडत नाही. वीज महाग असल्याने अनेक उद्योग राज्याबाहेर गेले आहेत. विजेची दरवाढ सरासरी २.५५ रु. प्रति युनिट म्हणजेच ३७ टक्के वाढविल्यास वीज ग्राहकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे वीजदर कमी करून समान पातळीवर आणण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी वीज ग्राहक संघटनांनी केली आहे.

या प्रकरणी वसई जनता दलाचे मनवेल तुस्कानो यांनीही वीज नियामक आयोगाकडे तक्रार करून महावितरणच्या दरवाढीला हरकत असून, ही मागणी मान्य करून नये, अशी भूमिका घेतली आहे.

### वीज दरवाढ प्रस्तावाच्या विरोधात आंदोलन

वीज दरवाढ प्रस्तावाच्या संदर्भात वसई-विरार शहरातील आम आदमी पार्टी (आप) व वीज ग्राहक संघटना आक्रमक झाल्या आहेत. २८ फेब्रुवारी रोजी वसई महावितरणच्या कार्यालयासमोर वीज दरवाढीच्या प्रस्तावाची होळी करून आंदोलन केले जाणार आहे, असे 'आप'चे जॉन परेरा यांनी सांगितले आहे.

### आधी वीज चोरांना आवरा

विजेची तूट भरून काढण्यासाठी महावितरण एकीकडे दरवाढ करण्याचा विचार करीत आहे. मात्र छुप्या मार्गाने व कर्मचारी वर्गाच्या संगनमताने होणारी वीज चोरी रोखण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. या वीज चोरीचा फटका महावितरणसह सर्वसामान्य वीजग्राहकांना बसत आहे. आधीच वाढीव वीजदेयकांमुळे ग्राहक मेटाकुटीला येत आहेत. दरवाढ करण्याआधी वीज चोरांना आवरा, अशी मागणी वीज ग्राहकांकडून करण्यात येत आहे.

(10)

## महिलेची आत्महत्या; सात जणांवर गुन्हे

**भाईंदर :** मीरा रोड येथे विवाहितेने सासरच्या मंडळींच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली आहे. याप्रकरणी सात जणांविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हे दाखल झाले आहेत.

मालाड येथे राहणाऱ्या अस्मिता मिश्रा (२६) हिचा विवाह मीरा रोड येथे राहणाऱ्या अभय मिश्रा याच्याशी २०२१ रोजी झाला होता. २४ फेब्रुवारी रोजी तिने घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. सासरच्या मंडळींकडून तिचा हुंड्यासाठी छळ केला जात होता, असा आरोप तिच्या वडिलांनी केला. याप्रकरणी त्यांच्या तक्रारीवरून पती अभय, सासरे मनीष, सासू प्रेमलता, दीर जयराज, नणंद पूर्णिमा व पायल आदी सात जणांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे, हुंडाबळी, फसवणूक आदी गुन्ह्याची नोंद केल्याची माहिती काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम यांनी दिली.

(11)

## नालासोपाऱ्यात शस्त्रांची तस्करी

**वसई :** नालासोपाऱ्यात शस्त्रांची बेकायदा विक्री करण्यासाठी आलेल्या तस्कराला गुन्हे शाखा २ च्या पथकाने अटक केली आहे. या आरोपीकडून गावठी बनावटीचा एक कट्टा, दोन काडतुसे आणि एक रामपुरी चाकू, असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ओसवालनगर परिसरात एक जण शस्त्र विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे गुन्हे शाखा २ च्या पथकाने तेथे सापळा रचला. या वेळी पृथ्वीराज भारती हा तरुण संशयितरीत्या आढळून आला. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून एक कट्टा, दोन काडतुसे आणि एक रामपुरी चाकू आढळून आला. त्यामुळे त्याला ताब्यात घेऊन अटक केली आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 28/02/2023

लोकसत्ता पृ. पान क्र. 1

(12)

# खोपरा गावात मेट्रो कारशेडसाठी सर्वेक्षण?

## स्थानिक ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मेट्रो मार्गिका ९ च्या कारशेडला राई मोरवा गावातील ग्रामस्थांनी विरोध केल्यानंतर ते पुढे स्थलांतरित करण्याची घोषणा शासनाकडून करण्यात आली. त्यानुसार खोपरा गावाजवळ असलेल्या शासकीय जागेचे सर्वेक्षण करण्याची प्रक्रिया भूमी अभिलेख विभागाकडून राबवली जात आहे. त्यामुळे हे कारशेड या ठिकाणीच येणार असल्याचा संशय ग्रामस्थांमध्ये निर्माण झाला असून भीतीचे वातावरण पसरले आहे.

मीरा भाईंदर मेट्रो मार्गिका ९ चे काम हे गेल्या अडीच वर्षांपासून प्रगतीपथावर आहे. मार्गिकेसाठी आवश्यक असलेल्या कारशेडची जागा भाईंदर पश्चिम येथील राई-मोरवा गावालगत ८७ एकरात एमएमआरडीएने निश्चित केली होती. परंतु तेथील ग्रामस्थांच्या विरोधामुळे हे कारशेड उत्तन येथे स्थलांतरित करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिवाळी अधिवेशनावेळी केली. त्यामुळे राई-मोरवा गावातील नागरिकांच्या मनात आनंदाचे वातावरण पसरले असल्याचे दिसून आले. परंतु आता उत्तनच्या खोपरा गावात असलेल्या सर्वे क्रमांक १९ वर भूमी अभिलेख, ठाणे विभागाकडून शासकीय जमिनीचे सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या संदर्भात जमीन धारकांना सोमवारी प्रत्यक्ष सर्वेक्षण स्थळी आपला सातबारा आणि नकाशा घेऊन उपस्थित राहण्याचे आवाहन भूमी अभिलेख कार्यालयाने जाहीर सूचनेद्वारे केले होते. त्यानुसार जमीनधारकांनी सर्वेक्षणाला उपस्थित राहून अधिकाऱ्यांना सहकार्य केले. परंतु हे सर्वेक्षण मेट्रो कारशेडसाठीच होत असल्याचा संशय नागरिकांमध्ये आहे. या ठिकाणी ऐतिहासिक चर्च, शाळा आणि ग्रामस्थांची घरे असताना देखील हा निर्णय घेतल्यामुळे जमीनधारकांच्या मनात भीती आहे. तर अद्यापही कोणताही निर्णय झाला नसून, दैनंदिन कामकाजानुसार सर्वेक्षण करण्याचे काम केले जात असल्याची माहिती अप्पर तहसीलदार नंदकिशोर देशमुख यांनी दिली.

### मेट्रो कारशेडबाबत संभ्रम कायम

भाईंदर पश्चिम येथील राई गावात नियोजित करण्यात आलेले मेट्रो कारशेड ग्रामस्थांच्या विरोधामुळे उत्तन येथे स्थलांतरित करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिवाळी अधिवेशनावेळी केली होती. मात्र मुख्यमंत्र्यांनी घोषणा करून देखील आजवर या बाबत लेखी आदेश प्रसिद्ध करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे कारशेडबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून कारशेडचा विरोध सुरू ठेवणार असल्याचे मत राई मोरवा गावातील भूमिपुत्र सामाजिक समन्वयक समितीचे अध्यक्ष अशोक पाटील यांनी व्यक्त केले.

(13)

# शिजान खानचा जामीन निर्णय आता २ मार्च रोजी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** अभिनेत्री तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणात अद्याप आरोपी शिजान खानला जामीन मिळाला नाही. सोमवारी त्याच्या जामीन अर्जावरील दोन्ही बाजूंनी युक्तिवाद झाला असून पुढील सुनावणी आता २ मार्च रोजी होणार आहे.

२४ डिसेंबर २०२२ रोजी अभिनेत्री तुनिशा शर्माने आत्महत्या केली होती. तिचा माजी प्रियकर शिजान खान याच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली होती. सध्या शिजान न्यायालयीन कोठडीत आहे. उच्च न्यायालयाने जामीनासाठी हे प्रकरण पुन्हा वसईच्या सत्र न्यायालयात पाठवले होते. सोमवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने दोन्ही बाजूंकडील युक्तीवाद ऐकला. मात्र जामीनाचा निर्णय २ मार्च रोजी देणार असल्याचे न्यायालयाने सांगितले.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 28/02/2023

14) लोकमत पान क्र.3



भाईंदरच्या उत्तन धावगी येथील डम्पिंग ग्राऊंडला लागलेली आग विझविताना अग्निशमन दलाचे जवान.

# उत्तन डम्पिंग ग्राऊंडला पुन्हा आग, सर्वत्र धूर

## अग्निशमन दलाचा जवान रुग्णालयात

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरच्या उत्तन धावगी येथील डम्पिंगला रविवारी पुन्हा आग लागली. कचऱ्याच्या घातक धुरामुळे आग विझविण्यासाठी आलेल्या अग्निशमन दलातील जवान अस्वस्थ होऊन चक्कर येऊन पडल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

गेल्या शनिवारी डम्पिंगवर साचलेल्या कचऱ्याच्या डोंगरास भीषण आग लागली होती. आग इतकी प्रचंड होती की, ती आटोक्यात आणण्यासाठी दोन दिवस अग्निशमन दलास लागले होते. मात्र त्यानंतरही धूर निघत असल्याने तेथे अग्निशमन वाहने, टँकर व जवान तैनात करण्यात आले होते. ही घटना ताजी असतानाच रविवारी सायंकाळी कचऱ्याच्या डोंगरास पुन्हा आग लागली. पालिकेच्या अग्निशमन दलाचे पाच बंब, पाण्याचे टँकर आणि सुमारे २५ अधिकारी आणि जवान आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत होते. आग विझवताना अग्निशमन जवान वैभव पाटील हा धुरामुळे अस्वस्थ होऊन चक्कर येऊन पडला.

### आग लावण्यात येत असल्याचा संशय

दरम्यान, रविवारी कचऱ्याच्या डोंगरास लागलेली आग दोन बाजूने लागलेली होती. तसेच सुट्टीच्या दिवशीच आग लागत असल्याने आग लावण्यात येत असल्याचा संशय आता बळावला आहे, तर सततच्या आगी व धुराने त्रस्त नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, पालिकेने ठोस उपाययोजना करून आगी लावणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे.

15) लोकमत पू. पान क्र.1

# लक्ष्मीदेवी नाराज असल्याचे सांगून पळविली 'लक्ष्मी'

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलेस तुमच्यावर लक्ष्मीदेवी कोपली असल्याचे सांगून महिलेकडील दागिने, रोख, मोबाईल असा दीड लाखाचा ऐवज दोघांनी लुटल्याची घटना मीरारोडमध्ये घडली. मीरारोडच्या भक्ती वेदांत रुग्णालयाजवळ रोझ गार्डनमध्ये राहणाऱ्या ज्योती त्रिवेदी (वय ४७) या कामावर जाण्यासाठी शनिवारी घरातून बस स्टॉपकडे जात होत्या. त्यावेळी पत्ता विचारण्याच्या बहाण्याने दोघांनी त्यांना थांबवले. लक्ष्मीमाता तुमच्यावर नाराज आहे. देवीची नाराजी घालवण्यासाठी उपाययोजना करा, अन्यथा तुमच्या भावाचा मृत्यू होईल, असे सांगून त्यांनी ज्योती यांना भीती दाखविली. विधीसाठी दागिने काढून ठेवण्यास सांगितले. ज्योती यांनी चेन, बांगड्या, अंगठी काढून पर्समध्ये ठेवली. ती पर्स इसमाच्या हाती देत त्या मागे वळून न बघता ८० पावले चालत गेल्या. नंतर मागे वळून पहिले असता ते दोघेही इसम पळून गेले होते.

CS CamScanner

Scanned with CamScanner

DIGITAL
मुंबई, मंगलवार, 28 फरवरी 2023
प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# संत निरंकारी मिशन के 'प्रोजेक्ट अमृत' का शुभारंभ

■ प्रवासी संदेश टीम।

**भायंदर।** स्वच्छ जल - स्वच्छ मन अभियान, सार्वजनिक स्वच्छता के साथ-साथ मानसिक स्वच्छता भी जरूरी है। आजादी के 75वें अमृत महोत्सव के तत्वावधान में सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज और निरंकारी राजपीता जी के पावन कर कमलों द्वारा अमृत प्रोजेक्ट, स्वच्छ जल - स्वच्छ मन का शुभारंभ यमुना उठ( एम.टी.ओ.) से किया गया। इसके साथ ही सतगुरू माता जी की पावन कृपा से भारत के 27 राज्यों और केंद्र शासित प्रदेशों के 730 शहरों में 1100 से अधिक स्थानों पर इस परियोजना का भव्य आयोजन किया गया। बाबा हरदेव सिंह की शिक्षाओं से प्रेरणा लेते हुए संत निरंकारी मिशन द्वारा ये आयोजन किया गया।

सतगुरु माता सुदीक्षा महाराज के दिव्य निर्देशन में अमृत परियोजना का उद्घाटन करते हुए, जल के महत्व पर प्रकाश डालते हुए कहा कि ईश्वर ने हमें यह जल अमृत के रूप में दिया है, हम सबका कर्तव्य है कि इसे इसी तरह




संभालें। साफ पानी के साथ रहना बहुत जरूरी है क्योंकि इसी भावना से हम सबके लिए परोपकार का यह काम करते हैं। इस प्रोजेक्ट के तहत मुंबई से सटे मीरा भायंदर के उत्तन समुंदर किनारे पर सफाई अभियान चलाया गया, जिसमें 600 से ज्यादा सेवाकर्मियों ने हिस्सा लिया। इस अवसर पर मीरा भायंदर नगर निगम आयुक्त दिलीप ढोले सहित उपायुक्त रवि पवार, उपायुक्त शरद नानेगांवकर व मीरा भायंदर भाजपा जिलाध्यक्ष रवि व्यास आदि गणमान्य व्यक्ति उपस्थित रहे और मिशन के कार्यों की प्रशंसा की। साथ ही स्वयं अपने हाथों से सफाई कर स्वयंसेवकों का उत्साह बढ़ाते हुए दिलीप ढोले ने कहा कि निरंकारी मिशन और उनकी समाज के प्रति सेवा लगन को देखते हुए हमे बहुत खुशी हुई है, आज जो मिशन ने ये अभियान चलाया है इनका धन्यावाद करते है और सभी ऐसे अच्छे कार्यों के लिए उनका पूरा सहयोग किया जाएगा ' वही जिलाध्यक्ष रवि व्यास ने भी मिशन के कार्यों की प्रशंसा की। इसके अलावा मुंबई के ठाणे और उरण में करीब 50 जगहों की सफाई की गई जिसमें समुद्र तट, झील, तालाब आदि शामिल है। उल्लेखनीय स्थानों में दादर शिवाजी पार्क चौपाटी, हिंदुजा अस्पताल चौपाटी, मगदुम शाह बाबा दरगाह बीच, जॉगर्स पार्क से खारदंडा, जुहू बीच से गोदरेज बंगला बीच, जुहू कोलीवाड़ा से जुहू बीच, बीच साही, सावा जेही, इंदु मिल चौपाटी, गणेश विसर्जन तालाब, मिठागर शामिल हैं। मुलुंड के छत्रपति शिवाजी तालाब, भांडुप, भांडुपेश्वर तालाब, कांजुरमार्ग, छोटा कश्मीर तालाब (अरे कॉलोनी)। बुजाले ताल चिंचोली, मलाड, लोटस लेक, मालवणी, भुजाले तालाब, चिंचोली मलाड, के साथ थाने, नवीं मुंबई के कई इलाकों मे ये अभियान चलाया गया।

Scanned with CamScanner

पुढारी

# भाईंदरमध्ये बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई

## वाहतूककोंडी करणाऱ्यांना ठोठावला दंड

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाण पुलाच्या बाजूला रिक्षा उभ्या करणाऱ्या रिक्षावर काशिमिरा वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे.

भाईंदर पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाण पुलाच्या बाजूलाच गेल्या काही दिवसांपासून रिक्षाचालकांनी रिक्षा स्टॅंड बनवले होते. या रिक्षामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे उड्डाणपुलाच्या सुरुवातीला रिक्षा उभ्या करून प्रवाशांची प्रतीक्षा करत प्रवासी वाहतूक केली जात होती. वाहतूक विभागाने या समस्येकडे कानाडोळा केला जात होता. यामुळे शहरातील रिक्षाचालकांची हिंमत वाढत गेली व उड्डाण पुलाला रिक्षा स्टॅंडचे स्वरूप निर्माण झाले होते. काशिमीरा वाहतूक पोलिसांनी उड्डाणपुलावर रिक्षा उभ्या करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

गोल्डन नेस्ट परिसरात उड्डाणपुलावर रिक्षा उभ्या करत वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या २० ते २५ रिक्षाचालकांवर वाहतूक पोलिसांनी कलम १२२, १७७ प्रमाणे नो- पार्किंगच्या कारवाई करत प्रत्येकी ५०० रुपये दंड आकारला असल्याची माहिती वाहतूक विभागा मार्फत देण्यात आली आहे. उड्डाणपुलावर अवैधरित्या रिक्षा पार्किंग करून वाहतुकीचा अडथळा निर्माण करणाऱ्या रिक्षा चालकांवर यापुढेही सतत कारवाई केली जाणार असल्याचे सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक नरळे वाहतूक विभाग यांनी सांगितले आहे.

My Thane Edition
Feb 28, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

DIGITAL
मुंबई, मंगलवार, 28 फरवरी 2023
प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# एमबीएमसी कला क्रीड़ा महोत्सव क्रिकेट में एमबीवीवी पुलिस आयुक्तालय ने जीता फाइनल



**प्रवासी संदेश टीम।**

**वसई।** मीरा-भायंदर शहर महानगरपालिका खेल विभाग द्वारा 26 फरवरी से 27 फरवरी 2023 तक पावेतो नेताजी सुभाष चंद्र बोस मैदान, भायंदर (प.) में कला क्रीड़ा महोत्सव 2022-2023 के संयोजन में एक टेनिस क्रिकेट टूनामेंट का आयोजन किया गया था इस टूनामेंट में मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के अधिकारियों और प्रवर्तकों की एक टीम ने भाग लिया। टीम का नेतृत्व मुख्यालय सहायक पुलिस आयुक्त विनायक नरळे ने किया। महोत्सव में पुलिस, शहर मनपा, फायर ब्रिगेड, स्वास्थ्य विभाग, वन विभाग की कुल 18 टीमों ने भाग लिया।

## सीपी ने दी बधाई

मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय की टीम ने क्रिकेट टूनामेंट के दौरान 3 टीमों को हराकर फाइनल मैच में प्रवेश किया। फाइनल मुकाबले में मीरा-भाईंदर शहर मनपा की वार्ड नंबर 4 की टीम द्वारा दिए गए 58 रनों के लक्ष्य को 36 गेंदों में पुलिस कमिश्नरेट ने पूरा किया और जीत हासिल की. जीत के बारे में जब आयुक्त मधुकर पाण्डेय और अतिरिक्त पुलिस आयुक्त श्रीकांत पाठक को मिली तब उन्होंने पुलिस आयुक्तालय की क्रिकेट टीम को बधाई दी।

**टीम स्क्वाड:** उक्त क्रिकेट टीम में विनायक नरळे, सहायक पोलीस आयुक्त, मुख्यालय, पो.नि. कुमारगौरव धादवड, राहुल राख, स.पो.नि. सतीश निकम, शैलेन्द्र पाटील, पो.उप.नि. किशोर धायगुडे, स्वनील बेलोसे, राम कदम, पो.हवा गणेश कदम, अनिल शिरसाट, प्रशांत सोनावणे, अतुल गोसावी, गजानन सुरोशी, निलेश शेळके, स्वप्नील पशिलकर, गाडेकर, पो. अंम. विलास सोमवंशी, विक्रम गडवे, किरण विरकर सहभागी थे।

Scanned with CamScanner

लोकमत

# पोलिस आयुक्तालयाचा क्रिकेट संघ ठरला विजेता



**क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात पालिका वॉर्ड नं. ४ च्या संघाने दिलेले ३६ चेंडूंमध्ये ५८ धावांचे लक्ष्य पोलिस संघाने पूर्ण करून विजेतेपद मिळविले.**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मीरा भाईंदर महापालिका क्रीडा विभागामार्फत २६ व २७ फेब्रुवारीला भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अंतिम सामन्यात पालिका वॉर्ड नं. ४ च्या संघाने दिलेले ३६ चेंडूंमध्ये ५८ धावांचे लक्ष्य पोलिस संघाने पूर्ण करून विजय मिळविला. पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय, अपर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक यांनी क्रिकेट संघास विजयाबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

या स्पर्धेत पोलिस अधिकारी व अंमलदार यांच्या संघाने सहभाग घेतला होता. या संघाचे नेतृत्व मुख्यालयातील सहायक पोलिस आयुक्त विनायक नरळे यांनी केले. पोलिस, महापालिका, अग्निशमन दल, आरोग्य विभाग, वन विभाग अशा एकूण १८ संघांचा सहभाग होता. पोलिस संघाने क्रिकेट स्पर्धेदरम्यान तीन संघांचा पराभव करून अंतिम सामन्यात प्रवेश केला होता. या संघामध्ये सहायक पोलिस आयुक्त विनायक नरळे, पोलिस निरीक्षक कुमारगौरव धादवड, राहुल राख, सहायक पोलिस निरीक्षक सतीश निकम, शैलेन्द्र पाटील, उपनिरीक्षक किशोर धायगुडे, स्वनिल वेलोसे, राम कदम, हवालदार गणेश कदम, अनिल शिरसाट, प्रशांत सोनावणे, अतुल गोसावी, गजानन सुरोशी, नीलेश शेळके, स्वप्निल पशिलकर, गाडेकर, विलास सोमवंशी, विक्रम गडवे, किरण विरकर यांचा सहभाग होता.

Scanned with CamScanner

# Recharging FASTag, doctor loses ₹99k

A 34-year-old doctor working with a reputed hospital in Mira Road was duped of Rs99,000 after he tried to recharge his FASTag account by calling the helpline number of a bank available on an online search engine.

The complainant was travelling to Mumbai in his car when he realised that his FASTag balance was low to pay for the toll. He tried searching for the helpline number on the search engine and called up the number that was listed as a helpline to facilitate online recharge via a banking platform.

Under the guise of getting the Know Your Customer (KYC) process done, the person posing as a representative sent a malicious link. The complainant forwarded the link to a specified number but was shocked to learn that Rs99,000 had been fraudulently siphoned from his bank account.

A toll collection system, operated by the National Highways Authority of India (NHAI), the FASTag is an online mechanism for which radio frequency identification (RFID) stickers are affixed on windscreen. *–Suresh Golani*

Scanned with CamScanner